महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
**मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे**
सिंचन भवन, मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे- ४११०११
कार्यालय (०२०) २६१२०५०५ / २६१२५०७४ फॅक्स (०२०) २६१२६०२५

जा.क्र.मुअ(जसं)/(५२/२०१९)/प्रशा-८/ No - 5 3 9 0 दिनांक : 21 DEC 2019

प्रति,

मा.कार्यकारी संचालक,
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,
पुणे

विषय : मे.नाईकनवरे प्रोफाइल्स कन्स्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता.मुळशी जि.पुणे या संस्थेस मुळशी मध्यम प्रकल्पा मधून पिण्यासाठी बिगर सिंचन मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करणेबाबत .....

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य(धो), दि.१७.११.२०१६
२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/(५११/१८)/सिंव्य(धो), दि.१.१२.२०१८
३) अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.पुपामं/बिगर सिंचन/१२७८, दि.१८.१२.२०१९

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ नुसार, शासनाने 'महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५' मधील कलम १६ (क) तरतुदीनुसार पिण्यासाठी १५% व औद्योगिकसाठी १०% व सिंचनासाठी ७५% याप्रमाणे पाण्याचे क्षेत्रीय वाटप निर्धारित केले आहे.

त्यानुसार, मे.नाईकनवरे प्रोफाइल्स कन्स्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता.मुळशी जि.पुणे या संस्थेने मौजे म्हाळुंगे येथील गट क्रमांक ८/३ ते ८/७, ८/९ ते ८/१४ मधील ५.०९ हेक्टर क्षेत्रावरील "नियोजित गृहप्रकल्पाकरीता" घरगुती (पिण्यासाठी) प्रयोजनासाठी मुळशी प्रकल्पामधून बिगर सिंचन आरक्षणचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये प्रदेश कार्यालयास सादर केला आहे. त्याची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे

१) सदर योजनेकरीता स्त्रोत **मुळशी** मध्यम प्रकल्प असून उदभव मुळा नदीवरील वाकड को.प.बंधा-याच्या जवळून पाणी उचलण्याचे प्रस्तावीत केले असून सदर संस्थेची एकुण मागणी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रयोजन | निव्वळ मागणी (दलघमी) | तूट (दलघमी) | एकुण (दलघमी) |
|---|---|---|---|---|
| १ | घरगुती (पिण्यासाठी) | ०.०८५१ | ०.०१७०५ | ०.१०२१५ |
| | **एकुण** | **०.०८५१** | **०.०१७०५** | **०.१०२१५** |

२) मुळशी मध्यम प्रकल्प (बोगदा) प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा ४६.६१ दलघमी आहे. व त्याभागातील नागरीकरणासाठी पाण्याची गरज लक्षात घेऊन खरीप मधील ६.७५ दलघमी बचतीतून अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या उपयुक्त पाणीसाठयानुसार बिगर सिंचन आरक्षणाची आकडेवारी खालीलप्रमाणे येत आहे.

| अ. क्र. | तपशील | पिण्यासाठी | औद्योगिक | एकुण | सिंचन क्षेत्र कपात (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| अ) | प्रकल्पीय तरतुद | | | | |
| १ | सिंचन आरक्षण | ३३.९८ | | ३३.९८ | |
| २ | बिगर सिंचन आरक्षण | १२.६३ | | १२.६३ | |
| | एकुण | ४६.६१ | | ४६.६१ | |

१०) तसेच मुळशी मध्यम प्रकल्पाचे सुधारित जलनिष्पती व फेर जल नियोजन केले आहे. त्यामध्ये मुळा नदीच्या खो-यामध्ये भरपूर प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे खरीप हंगामात नदीमध्ये सारखा प्रवाह चालू असतो. तसेच मुळशी प्रकल्पाचे नियोजन हे त्याखाली असलेल्या को.प.बंधा-यारे होत असल्यामुळे खरीप हंगामामध्ये दि.१५.१० पर्यंत को.प.बंधा-याचे दरवाजे बसविण्यांत येत नसल्यामुळे मुळशी प्रकल्पातून खरीप हंगामाकरीता मुळा नदीत पाणी सोडण्याची आवश्यकता नसते. **त्यामुळे मुळशी प्रकल्पातून आतापर्यंत मंजूर दिलेल्या २०.२५ दलघमीमधून खरीपातील पाण्यात होणारी बचत ६.७५ होत आहे, सदर बचतीतून मुळशी प्रकल्पाच्या पाण्याचे फेरनियोजन करण्यांत आले आहे.**

११) मुळशी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात नागरीकरण व औद्योगिकरण झपाटयाने वाढ होत आहे. त्यामुळे बिगर सिंचन आरक्षणाची मागणी वाढत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस सिंचन कपात करुन बिगर सिंचनासाठी पाणी द्यावे लागणार आहे. यास्तव सदर प्रकल्पातून नदीत उपलब्ध होणा-या पाण्याचे क्षेत्रिय वाटप शासनस्तरावर होऊन तयानुसार करारनाम्यात बदल होणे आवश्यक आहे.

**१२) खालील अटींच्या अधीन राहून बिगर सिंचन आरक्षण प्रस्ताव मंजुरीची शिफारस करण्यांत येत आहे.**

- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश ०९/२०१७ दि.२२.०९.२०१७ व आदेश १/२०१८ दि.११.०१.२०१८ मधील सर्व अटी व शर्ती सदर संस्थेस लागू राहातील
- बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर झाल्यावर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी व पूनर्वापर यंत्रणेचा आराखडा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मंजूर करुन घेवून जलसंपदा विभागास सादर करणे बंधनकारक असेल.
- संस्थेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मापदंडाप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन कमीत कमी २० टक्के प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक राहिल. व Rain Water Harvesting करणे संस्थेस बंधनकारक असेल.
- संस्थेस वहनव्ययासह पाणी पुरवठा होत असल्यास, नियंत्रित पाणी पुरवठा वर्गवारीचे दर लागू राहतील
- आरक्षण मंजूर झाल्याबरोबर शासनाचे भाववाढीनुसार सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणा करुन करारनामा करणे बंधनकारक आहे.
- प्रस्तावित असलेल्या जमिनीच्या मालकी हक्काची व योजनेची पाईपलाईन करण्याकरीता व जॅकवेल, इनटेक वेलसाठी लागणा-या जमीनीची व्यवस्था करणे संस्थेची जबाबदारी असेल.
- संस्थेचे बांधकाम पूर्ण होवून पूर्णत्वाचा दाखला देईपर्यंत औद्योगिक दराने व बांधकाम पूर्ण झालेनंतर घरगुती दराने पाणीपटटी आकारणी करण्यांत येईल.
- योजना कार्यान्वीत करण्यापुर्वी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.
- शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे पाणीपट्टी भरणे, इलेक्ट्रॉनिक जलमापन यंत्र बसविणे संस्थेस बंधनकारक राहील
- प्रचलित शासन नियमाप्रमाणे साठवण तलाव बांधणे आवश्यक आहे

त्यानुसार, **मे.नाईकनवरे प्रोफाइल्स कन्स्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता.मुळशी जि.पुणे** या संस्थेच्या नियोजित गृहप्रकल्पाकरीता घरगुती (पिण्यासाठी) ०.१०२१५ दलघमी पाणीवापरासाठी मुळशी प्रकल्पामधून बिगर सिंचन आरक्षणचा प्रस्ताव शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिव्य(धो), दि.१७.११.२०१६ व दि.१.१२.२०१८ नुसार मान्यतेसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे.

हे आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत: मुळ प्रस्ताव

**मुख्य अभियंता (जसं),**
**जलसंपदा विभाग, पुणे**

प्रत : अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना संदर्भपत्रानुसार माहितीसाठी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ब) | क्षेत्रीय वाटप मर्यादा | ६.९९२ | ४.६६१ | ११.६५३ | |
| क) | मंजूर/प्रस्तावीत आरक्षण | | | | |
| ३ | यापूर्वीच्या मंजूर योजना-३८ | १८.०१११८ | ४.२०६२५ | २२.२१७४ | १४५८.२७ |
| ४ | मंजूरीस सादर योजना-१३ | ३.४६६५ | ०.१४४७ | ३.६११२ | ५३१.३७ |
| ५ | प्रस्तुत प्रस्तावाची मागणी-१ | ०.१०२१५ | ०.०० | ०.१०२१५ | १५.०३ |
| ६ | एकुण- बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा पाणीसाठा | २१.५७९८३ (४६.३०%) | ४.३५१० (९.३३%) | २५.९३०७८ (५५.६३%) | २००४.६७ |

३) सदर संस्था सन २०३१ ची लोकसंख्या ३७०२ इतकी गृहित धरुन घरगुती पाणीवापरासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे आदेश १०/२०१८ दि.२५.०६.२०१८ नुसार विशेष नगर वसाहतींना अनुज्ञेय असलेल्या ९० लिटर/माणशी/दिन प्रमाणे निकष प्रस्तावित केले आहे..

४) त्यानुसार संस्थेच्या घरगुती वापरासाठी एकुण ०.१२१६ दलघमीची मागणी केली असून त्यामध्ये २०% वहनतुट धरुन ०.१४५९ दलघमी येत असून त्यापैकी ३०% पाणी पुनर्वापर वापराद्वारे प्रस्तावित असल्याने ते वगळून निव्वळ मागणी ०.१०२१५ दलघमी इतकी येत आहे.

५) मुळशी मध्यम प्रकल्प (बोगद्या) च्या करारनुसार प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा ४६.६१ दलघमी आहे. प्रकल्प अहवालानुसार सिंचनासाठी ३३.९८ दलघमी व बिगर सिंचनासाठी १२.६३ दलघमी अशी तरतूद आहे. सदर प्रकल्पाचे प्रकल्पीय सिंचनक्षेत्र ५००० हे. इतके आहे.

६) सदर प्रस्तावापूर्वी ३६ बिगर सिंचन योजना मंजूर असून त्यापोटी पिण्यासाठी १८.०१११८ दलघमी व औद्योगिक वापरासाठी ४.२०६२५ दलघमी अशी एकुण २२.२१७४ दलघमी बिगरसिंचन मंजूरी देण्यात आली आहे. त्यानंतर शासनाकडे/महामंडळाकडे एकुण १३ प्रस्तावीत योजनाकरीता पिण्यासाठी ३.४६६५ दलघमी व औद्योगिकसाठी ०.१४४७ दलघमी असे एकुण ३.६११२ दलघमी चे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. आता, चालू घरगुती(पिण्यासाठी) मागणी ०.१०२१५ दलघमी विचारात घेऊन बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा पाणीसाठा पिण्यासाठी २१.५७९८३ व औद्योगिक ४.३५१० दलघमी एकुण २५.९३०७८ दलघमी होत आहे.

७) आतापर्यंतच्या मंजूर असलेल्या बिगरसिंचन आरक्षणामुळे १४५८.२७ हे. सिंचन कपात झाली असून शासनाकडे/महामंडळाकडे मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावापोटी ५३१.३७ हे. व प्रस्तावित चालू मागणीमुळे १५.०३ हे. असे मिळुन एकुण सिंचन कपात २००४.६७ हे. इतकी होत आहे. ते प्रकल्पीय सिंचन क्षमतेच्या ४०.०९ टक्के होत असून आता उपलब्ध होणारी उर्वरित सिंचनक्षमता २९९५.३३ हे. इतकी आहे.

८) शासन निर्णयानुसार सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च सन २०१९-२० च्या महागाई निर्देशांकाप्रमाणे १५.०३ x १.९५ लक्ष/हे = रू.२९.३१ लक्ष येत असून तो खर्च भरणेस संस्था तयार आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक जलमापन यंत्र बसविणेबाबत व प्रचलित शासन नियमाप्रमाणे पाणीपट्टी भरण्यास तयार असले बाबत व साठवण टाकी बांधणेस तयार असलेबाबत सदर संस्थेने लेखी हमी पत्र सादर केले आहे.

९) मुळशी धरणाच्या खालील बाजुस नदीवर को.प.बंधा-याची श्रृखला बांधण्यात आली आहे. टाटा पॉवर कंपनीने सन १९३६ मध्ये केलेल्या करारनाम्यातील कलम ९ प्रमाणे धरणाखालील भागातील मुळा नदीत प्रवाह २० घ.फु./सें. इतका ठेवण्याची तरतुद असुन सदर पाणी त्या भागातील बिगर सिंचनासाठी वापरण्याचे नियोजन आहे.

तसेच सन २००३ मध्ये मुळशी धरणाची उंची १.०० मी वाढवुन त्यातून उपलब्ध होणारा वार्षीक ३३.९८ दलघमी (१.२० टीएमसी) पाणीसाठा गरजेनुसार मुळा नदीत सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत टाटा पॉवर कंपनी व मकृखोवि, पुणे यांचे समवेत करार केलेला आहे. व सन २००३ मधील करारनाम्यानुसार १ क्यसेक्स विसर्गाने वर्षभर व १९३६ मधील करारनाम्यानुसार २० क्युसेक्स विसर्गाने ८ महिने कालावधीधरुन बिगर सिंचनासाठी १२.६३ दलघमी पाणी उपलब्ध होत आहे. या करारनाम्यातील तरतुदीनुसार सिंचनासाठी ३३.९८ दलघमी पाणी वापर प्रस्तावीत असून प्रकल्पीय सिंचन क्षमता ५००० हे. इतकी आहे व बिगर सिंचनासाठी प्रकल्पीय अहवालातील तरतूद १२.६३ दलघमी आहे. यानुसार मुळा नदी मध्ये उपरोक्त करारनाम्यानुसार नदीत उपलब्ध होणारी जलनिष्पती ४६.६१ दलघमी इतकी आहे.

अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११
सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे-११
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२ ६९४१, २६१२६२८९ (टेलिफॅक्स) Email : sepic_pune@wrd.maharashtra.gov.in

जा.क्र.:पुपामं/बिसिमशा/ /सन 2019 दिनांक :

प्रति,
मा.मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग,
पुणे-11.

विषय : मुळशी मध्यम प्रकल्पात बिगरसिंचन पाणी आरक्षण करुन मुळा नदीतुन संस्थेच्या गृहप्रकल्पासाठी घरगुती वापराकरीता कायमस्वरुपी वाढीव पाणी आरक्षण मिळणेबाबतचा प्रस्ताव - मे. नाईकनवरे प्रोफाइल्स कन्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता. मुळशी जि. पुणे

संदर्भ :-१) मे. नाईकनवरे प्रोफाइल्स कन्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता. मुळशी जि. पुणे यांचे दि. १० /१२/२०१९ रोजीचे पत्र.
२) कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र. पुपावि/प्रशा-१/ मे. नाईकनवरे प्रोफाइल्स इंजि./ ७२६१/ सन २०१९ दि.१६.१२.२०१९

विषयांकित प्रकरणी, मे. नाईकनवरे प्रोफाइल्स कन्ट्रक्शन प्रा.लि. म्हाळुंगे ता. मुळशी जि. पुणे या संस्थेचा प्रस्तावित गृहप्रकल्पाकरीता घरगुती वापरासाठी मुळशी मध्यम प्रकल्पात पाणी आरक्षीत करुन मुळा नदीतुन वाकड को.प.बंधाऱ्याच्या जवळुन बिगर सिंचन आरक्षणाचा प्रस्ताव का.अ.पुणे पाटबंधारे विभाग पुणे यांचेकडुन संदर्भ पत्र क्र.१ अन्वये प्राप्त झाला आहे. तो खालीलप्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

१) सदर योजनेसाठी उदभव मुळशी मध्यम प्रकल्पात पाणी आरक्षीत करुन वाकड को.प.बंधाऱ्याच्या जवळून प्रस्तावीत केले आहे. सदर योजनेची खालीलप्रमाणे मागणी आहे.

| अ.क्र. | प्रयोजन | निव्वळ मागणी (दलघमी) | तूट (दलघमी) | एकुण (दलघमी) |
|---|---|---|---|---|
| १ | पिण्यासाठी (घरगुती) | ०.०८५१ | ०.०१७०५ | ०.१०२१५ |
| | **एकुण** | ०.०८५१ | ०.०१७०५ | ०.१०२१५ |

Scanned by CamScanner

२) मुळशी मध्यम प्रकल्पाचा उपयुक्त पाणीसाठा ४६.६१ दलघमी व प्रकल्पीय सिंचन क्षमता ५००० हेक्टर आहे. सदर प्रकल्पचा बिगर सिंचन आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | पिण्यासाठी | औद्योगिक | एकुण | सिंचन क्षेत्र कपात (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिंचन आरक्षण | ३३.९८+ ६.७५ खरीप बचत | | ३३.९८+ ६.७५ खरीप बचत | |
| २ | बिगर सिंचन आरक्षण | १२.६३ | | १२.६३ | |
| | **एकुण** | ४६.६१+ ६.७५ खरीप बचत | | **४६.६१+** ६.७५ खरीप बचत | |
| ३ | यापुर्वीच्या मंजूर योजना | १८.०१११८ | ४.२०६२५ | २२.२१७४३ | १४५८.२७ |
| ४ | मंजूरीस सादर योजना(१३) | ३.४३८७ | ०.१४४७ | ३.५८३४ | ५२७.२८ |
| ५ | प्रस्तुत प्रस्तावाची मागणी (वाढीव) | ०.१०२१५ | ०.०० | ०.१०२१५ | १५.०३ |
| ६ | **एकुण-** बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा पाणीसाठा | २१.६५४१८ | ४.३५०९५ | २५.९०२९८ | २०००.५८ |
| ७ | **एकुण -उर्वरित** | | | २७.४५७०२ | २९९९.४२ |

३) उपरोक्त संस्थेची एकूण प्रस्तावित पाणी मागणी ०.१०२१५ दलघमी घरगुती वापरासाठी असून एकुण मागणी पैकी ३० टक्के पाणी प्रक्रीया करुन पुर्नवापर करण्याचे संस्थेने प्रस्तावित केलेले असुन निव्वळ वापर ०.०८५१ दलघमी + वहनतुट ०.०१७०५ दलघमी अशी **एकूण मागणी** ०.१०२१५ दलघमी आहे.

४) सदर पाणी आरक्षण प्रस्तावासाठी सदर संस्थेची सन २०३१ ची लोकसंख्या ३७०२ इतकी गृहित धरून त्याच्या वापरासाठी ९० लि/प्रती माणशी/प्रतीदिन याप्रमाणे विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे विचारात घेतले आहे. सदर गृहप्रकल्प मोठा असल्याने गृहप्रकल्पामध्ये **अद्यावत सुविधा** व **फ्लशिंग सिस्टीम** बसविण्यात येणार असल्याने महाराष्ट्र जलसंपती नियमन प्राधिकरण यांच्या मापदंडानुसार पाणी मागणी प्रस्तावित केली आहे.

Scanned by CamScanner

५) मुळशी धरणाच्या खालील बाजुस नदीवर को.प.बंधा-याची शृखला बांधण्यात आली आहे. टाटा पॉवर कंपनीने सन १९३६ मध्ये केलेल्या करारनाम्यातील कलम ९ प्रमाणे धरणाखालील भागातील मुळा नदीत प्रवाह २० घ.फु./सें. इतका ठेवण्याची तरतुद असुन सदर पाणी त्या भागातील बिगर सिंचनासाठी वापरण्याचे नियोजन आहे.

तसेच सन २००३ मध्ये मुळशी धरणाची उंची १.०० मी वाढवुन त्यातून उपलब्ध होणारा वार्षीक ३३.९८ दलघमी (१.२० टीएमसी) पाणीसाठा गरजेनुसार मुळा नदीत सिंचनासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत टाटा पॉवर कंपनी व मकृखोवि, पुणे यांचे समवेत करार केलेला आहे. (प्रत सोबत)

यानुसार योजनेचा उदभव मुळा नदी असून उपरोक्त करारनाम्यानुसार नदीत उपलब्ध होणारी जलनिष्पती ४६.६१ दलघमी इतकी आहे. करारनाम्यातील तदतुदीनुसार सिंचनासाठी ३३.९८+ ६.७५ खरीप बचत दलघमी पाणी वापर प्रस्तावीत असून प्रकल्पीय सिंचन क्षमता ५००० हे. आहे. बिगर सिंचनासाठी प्रकल्पीय अहवालातील तरतूद १२.६३ दलघमी आहे.

६) सदर प्रस्तावापूर्वी पिण्यासाठी १८.०१११८ दलघमी व औद्योगिक वापरासाठी ४.२०६२५ दलघमी अशी **एकुण** २२.२१७४३ दलघमी बिगरसिंचन मंजूरी देण्यात आली आहे. त्यानंतर शासनाकडे प्रस्तावीत तेरा संस्थेचे पिण्यासाठी ३.४३८७ दलघमी व औद्योगिकसाठी ०.१४४७ दलघमी असे **एकुण** ३.५८३४ दलघमी चे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यांत आले आहेत. आता, प्रस्तावीत ०.१०२१५ दलघमी मागणीमुळे एकुण बिगर सिंचनासाठी वर्ग होणारा पाणीसाठा २५.९०२९८ **दलघमी** आहे, व तो बिगर सिंचनासाठी असलेल्या करारनाम्यातील तरतुदीपेक्षा १३.२७२९८ दलघमी ने जास्त होत आहे.

सदर भागात दिवसेंदिवस नागरीकरण व औद्योगिकरणात झपाटयाने वाढ होत आहे. त्यामुळे बिगर सिंचनासाठी मागणी वाढत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस सिंचन कपात करुन बिगर सिंचनासाठी पाणी दयावे लागणार आहे. यास्तव सदर प्रकल्पातून नदीत उपलब्ध होणा-या पाण्याचे क्षेत्रिय वाटप शासनस्तरावरुन होऊन त्यानुसार करारनाम्यात बदल होणे आवश्यक आहे.

७) आतापर्यंतच्या मंजूर बिगरसिंचन आरक्षणामुळे १४५८.२७हे. सिंचन कपात झाली असून शासनास मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावापोटी ३० टक्के पुनर्वापर वजा जाता ५२७.२८ हे. सिंचनक्षेत्र कपात होणार आहे. या प्रस्तावित पाणी मागणीमुळे **१५.०३** हे. सिंचन कपात होणार असुन **एकूण कपात २०००.५८** हे. इतकी होणार आहे. ती प्रकल्पीय सिंचन क्षमतेच्या ४०.०१ टक्के इतकी असून आता उपलब्ध होणारी उर्वरित सिंचनक्षमता २९९९.४२ हे. इतकी आहे. यापैकी सिंचनासाठी देण्यात आलेल्या परवानगीनुसारचे क्षेत्र ३९.३४ हे. इतके आहे. त्यामुळे निव्वळ शिल्लक क्षेत्र ४९६०.६६ हे. इतकेच रहाते.

८) शासन निर्णयानुसार सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च सन २०१९-२० च्या महागाई निर्देशांकाप्रमाणे १५.०३ x १.९५ लक्ष/हे = रु.७३.३८ लक्ष येत असून खर्च भरणेस संस्था तयार आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक जलमापन यंत्र बसविणेबाबत, प्रचलित शासन नियमाप्रमाणे पाणीपट्टी भरण्यास तयार असले बाबत व साठवण टाकी बांधणेस तयार असलेबाबत सदर संस्थेने लेखी हमी पत्र सादर केले आहे.

Scanned by CamScanner

९) शासन निर्देशानुसार आतापर्यंत मुळशी मध्यम प्रकल्पातून मंजुर असलेल्या ३४ संस्था व प्रस्तावित शासनाचे विचाराधीन असलेल्या १३ संस्थाची माहिती ई-जलसेवा प्रणालित भरण्यात आली आहे. तसेच Projectwise.N.I.Details या ई-जलसेवा प्रणालीची पृष्ठांची प्रत प्रस्तावासोबत सादर केलेली आहे.

❖ **खालील अटींच्या अधीन राहून बिगर सिंचन आरक्षण प्रस्ताव मंजुरीची शिफारस करण्यांत येत आहे.**

- बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजूर झाल्यावर सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी व पूनर्वापर यंत्रणेचा आराखडा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मंजूर करुन घेवून जलसंपदा विभागास सादर करणे बंधनकारक असेल.
- संस्थेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मापदंडाप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन कमीत कमी २० टक्के प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करणे बंधनकारक राहिल. व Rain Water Harvesting करणे संस्थेस बंधनकारक असेल.
- भविष्यामध्ये मीटरप्रमाणे आकारणी करताना वहनव्ययासह आकारणी करावी अशी अट करारनाम्यामध्ये घालणे आवश्यक आहे.
- आरक्षण मंजूर झाल्याबरोबर शासनाचे भाववाढीनुसार सिंचन पुनर्स्थापना खर्च भरणा करुन करारनामा करणे बंधनकारक आहे.
- **प्रस्तावित असलेल्या जमिनीच्या मालकी हक्काची व योजनेची पाईपलाईन करण्याकरीता व जॅकवेल, इनटेक वेलसाठी लागणा-या जमीनीची व्यवस्था करणे संस्थेची जबाबदारी असेल.**
- संस्थेचे बांधकाम पूर्ण होवून पूर्णत्वाचा दाखला देईपर्यत औद्योगिक दराने व बांधकाम पूर्ण झालेनंतर घरगुती दराने पाणीपटटी आकारणी करण्यांत येईल.
- योजना कार्यान्वीत करण्यापुर्वी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.
- शासनाचे प्रचलित नियमाप्रमाणे पाणीपट्टी भरणे, इलेक्ट्रॉनिक जलमापन यंत्र बसविणे संस्थेस बंधनकारक राहील
- बारमाही कालव्यावर १ महिने व आठमाही कालव्यावर ५ महिने पुरेल एवढया क्षमतेचा साठवण तलाव बांधणे आवश्यक राहील
- जरी पाणी मुळशी जलाशयात आरक्षित करण्यांत आले तरी प्रत्यक्ष पाणी उचल नदीतून होणार असल्याने नियंत्रित नदीच्या भागासाठी लागू असलेले पाणीपटटीचे दराने पाणीपटटी भरणे संस्थेस बंधनकारक राहील.
- प्रदेश कार्यालयाचे पत्र क्र. मु(जसं)/(३४९/२०१६)प्रशा-८/३५० दि. २२/०१/२०१८ अन्वये मंजुर केलेल्या मुळशी धरणाचे सुधारीत जलनियोजनानुसार खरीप हंगामातील बचतीतुन उपलब्ध होणारा ६.७५ दलघमी पाणीसाठयातुन सदर संस्थेचे पाणी आरक्षण मंजुरी विभागाने प्रस्तावीत केलेली आहे .

Scanned by CamScanner

शासन निर्णय दि.१७/११/२०१६ मधील अ.क्र.२.२ नुसार सदर पाणी आरक्षणास मा.मंत्री (जलसंपदा) यांचे मान्यतेस्तव प्रस्ताव सोबत शिफारसीसह सादर करण्यात येत आहे.

हे आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

सोबत : प्रस्ताव ३ प्रतीत

(सं.द.चोपडे) १६/१२/१९
अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ,
पुणे-११.

प्रत कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग पुणे यांना माहितीसाठी .

Scanned by CamScanner